पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान 'अमृत महोत्सव' शिबिर



e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 18/09/2025 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 220 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# आता प्रत्येक दुकानावर "गर्व से कहो, यह स्वदेशी है" बोर्ड लावा - नरेंद्र मोदी

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सणउत्सवांपूर्वीच पुन्हा एकदा देशवासीयांना स्वदेशी वापरण्याचा आग्रह केला. यावेळी स्वदेशी वापराचा देशाला काय फायदा होईल? यासंदर्भातही त्यांनी भाष्य केले. एवढेच नाही तर, प्रत्येक दुकानावर 'गर्व से कहो, यह स्वदेशी है',असे बोर्ड लागायला हवेत,असेही ते म्हणाले. ते आपल्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे आज मध्य प्रदेशातील धार येथे एका कार्यक्रमात बोलत होते.पंतप्रधान मोदी म्हणाले, "हा सणउत्सवांचा काळ आहे. आपण स्वदेशीचा मंत्र सातत्याने उच्चारायला हवा. तो तुमच्या जीवनाचा भाग व्हायला हवा. मी करबद्ध विनंती करतो की, तुम्ही जे काही खरेदी कराल, ते भारतात बनलेले असावे. तुम्ही जे काही खरेदी करता त्यासाठी कुण्यातरी भारतीयांचा घाम लागलेला असावा. तुम्ही जे काही खरेदी कराल,त्याला भारतीय मातीचा सुगंध असावा. मी व्यापाऱ्यांना देशासाठी मला पाठिंबा देण्याचे आवाहन करतो.दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी स्वदेशी खरेदीचे काही फायदेही सांगितले. ते म्हणाले, "जेव्हा आपण स्वदेशी वस्तूंची खरेदी करतो, तेव्हा आपला पैसा आपल्याच देशात राहतो. तो परदेशात जात नाही. तोच पैसा पुन्हा देशाच्या विकासात कामी येतो. याच पैशांपासून रस्ते तायार होतात. गावांत शाळा तयार होतात, तसेच हाच पैसा गरीब कल्याणच्या योजना राबवताना कामी येतो.मध्यम वर्गाच्या स्वप्नपूर्तीसाठी मोठ्या प्रमाणावर धनाची आवश्यकता असते. हे सर्व आपण अगदी छोट्या छोट्या गोष्टीतून साध्य करू शकतो. जेव्हा आपल्याला आवश्यक असलेल्या वस्तू आपल्याच देशात तयार होतात, तेव्हा रोजगार निर्मिती होते."मोदी पुढे म्हणाले, आता २२ सप्टेंबर रोजी, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून, नवे जीएसटी दर लागू होणार आहेत. तेव्हा आपण केवळ स्वदेशी उत्पादनेच खरेदी करायला हवीत. आपण एक मंत्र लक्षात ठेवायला हवा. तो प्रत्येक दुकानावर लिहिलेला असायला हवा, अशी माझी इच्छा आहे.

मी राज्य सरकारला एक मोहीम सुरू करण्याचा आग्रह करेन, प्रत्येक दुकानावर एक बोर्ड असावा - "गर्व से कहो, यह स्वदेशी है."

# मराठ्यांचे वादळ आता दिल्लीत धडकणार!

## मनोज जरांगे पाटील यांनी चलो दिल्लीचा नारा

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दिल्ली : मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील आत्ता दिल्लीला धडक देणार आहेत. विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी ऐन गणेशोत्सवात मुंबईत आंदोलन केले. सरकारने मनोज जरांगे यांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्यानंतर आनंद साजरा करत मराठा आंदोलक माघारी गेले. मनोज जरांगे यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जात असतानाच मनोज जरांगे यांनी दिल्ली गाठणार आहेत.मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मराठ्यांचे वादळ आता दिल्लीत धडकणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे ते दिल्लीमध्ये अधिवेशन घेणार आहेत. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे, असे म्हटले जात आहे.हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी झाल्यानंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचे अधिवेशन होणार आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे.

दिल्लीत आनंदोत्सव साजरा करायला जाणार. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी झाल्यानंतर आनंद सोहळा म्हणून दिल्लीला जाऊ.

तिथे आरक्षण नाही, कोणतेही आंदोलन नाही, मागणी नाही. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांनी अटकेपार झेंडा लावला, ती ठिकाणे पाहायला जाणार, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 18/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महिलांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : मोबाईलच्या अतिवापरामुळे डोळ्यात कोरडेपणा वाढतो. चष्म्याचा नंबर सारखा बदलतो. हे टाळण्यासाठी मोबाईल,लॅपटॉप संगणकाचा वापर कमी करावा, पापणीची सतत उघडझाप करावी, भरपूर पाणी प्यावे, दर एक तासांनी डोळ्यांना विश्रांती द्यावी, आकाशाकडे पहावे अशा टिप्स ईशा नेत्रालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. वैभव अवताडे यांनी नेत्र तपासणी शिबिरात दिल्या.

ईशा नेत्रालय आणि वर्षा सातुर्डेकर सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत सौ. वर्षा नंदकुमार सातुर्डेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बुधवारी ईशा नेत्रालय चिंचवड स्टेशन येथे महिलांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अवताडे बोलत होते.नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन ईशा नेत्रालयाचे चिंचवड शाखा प्रमुख दीपक कदम यांच्या हस्ते झाले. यावेळी संयोजक नंदकुमार सातुर्डेकर, डॉ. जयशील नाझरे, मार्केटिंग मॅनेजर यशवंत बो-हाडे, शिवानी शिंदे, दुर्वांक्षी पाटील, प्राची इनामदार, राधा सातुर्डेकर उपस्थित होते.यावेळी आधुनिक पद्धतीने नेत्र तपासणी करण्यात आली त्याबरोबरच डोळ्यांचे आजार तसेच डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत डॉ. वैभव अवताडे, डॉ. जयशील नाझरे यांनी मार्गदर्शन केले. तपासणीसाठी आलेल्या महिलांनी विचारलेल्या विविध शंकांचे यावेळी डॉ. अवताडे यांनी निरसन केले. सकाळी उठल्यावर डोळ्यांना लाळ लावणे योग्य आहे का? या प्रश्नावर ते म्हणाले की,असे करणे अयोग्य आहे. कारण आपण ब्रश केलेला नसतो, बॅक्टेरिया वाढलेले असतात. काळे बुबुळ निकामी होऊ शकते.डोळ्यांवर पाणी मारावे का ? असे विचारले असता डोळ्यात अश्रूंचे प्रमाण कमी असते. पाणी मारून शिल्लक अश्रू आपण वाहून घालवतो त्यामुळे डोळ्यावर पाणी मारणे अयोग्य असल्याचे ते म्हणाले.आपल्या भाषणात आहारात ओमेगा ३ फॅटीऍसिड असणे गरजेचे असल्याचे डॉ. अवताडे यांनी सांगितले. त्यावर हे कोणत्या पदार्थात असते असा प्रश्न केला असता यासाठी तीळ, जवस बदाम मासे खाल्ले पाहिजेत असे ते म्हणाले.

यावेळी सेंटर हेड दीपक कदम म्हणाले की, ईशा नेत्रालयाच्या महाराष्ट्रात आठ शाखा आहेत. नववी शाखा लवकरच वाकड येथे होत आहे. सर्व मशिनरी युएसड़ीए मान्यताप्राप्त आहे. ॲडव्हान्स तंत्रज्ञान जर्मन टेक्नॉलॉजी, जागतिक व अत्याधुनिक सुविधा असलेले एनएबीएच प्रमाणित हे नेत्र रुग्णालय आहे. सन २००० पासून १६ लाख रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. तर दोन लाखाहून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रेटीना व कॉर्निया उपचार, लॅसिक व लेझर दृष्टी सुधारणा, ग्लॉकोमा व्यवस्थापन, बाल नेत्र चिकित्सा, ओक्यूलोप्लास्टि, ड्राय आय उपचार केले जातात.चिंचवड शाखेत दररोज शंभर हून अधिक रुग्णांची तपासणी केली जाते. महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू असलेले हे नेत्रालय आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेत तसेच हेल्थ इन्शुरन्स कंपन्यांसोबत टायप आहे.

अठरा वर्षपेक्षा जास्त अनुभव असलेले सुपर स्पेशालिस्ट येथे कार्यरत आहेत, असे कदम म्हणाले

# वाकडमधील हॉटेलमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे मॉक ड्रिल

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रहाटणी उपअग्निशमन केंद्रामार्फत वाकड परिसरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये मंगळवारी (दि. १६) मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आपत्कालीन परिस्थिती व अग्निदुर्घटनेच्या प्रसंगी नागरिकांची व हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची सुरक्षित सुटका कशी करावी याबाबत मार्गदर्शनासह प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

सदर मॉक ड्रिल सहाय्यक आयुक्त (अग्नि) उमेश ढाकणे आणि उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्या आदेशानुसार, प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विजय घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मॉक ड्रिल मध्ये अग्निशमन विभागातील अधिकारी, स्थायी कर्मचारी, शिकाऊ जवान,सहभागी झाले हिते. तसेच यावेळी हॉटेल व्यवस्थापन प्रतिनिधी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मॉक ड्रिलमध्ये आग लागल्यास धुरामुळे होणारा गुदमरण्याचा धोका, लिफ्टचा वापर टाळणे, जिन्यांचा वापर करून बाहेर पडणे, हॉटेल व्यवस्थापनाने अग्निशमन यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करणे, तसेच अग्निशमन विभागाशी त्वरेने संपर्क साधणे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून अग्निशामक सिलिंडरचा वापर कसा करावा, धुरातून सुरक्षितपणे बाहेर कसे पडावे, तसेच बचाव कार्य करताना कोणती काळजी घ्यावी हे प्रात्यक्षिकातून दाखवून दिले.

**कोट**

अग्निदुर्घटनेची वेळ सांगून येत नाही. अशा वेळी योग्य निर्णय आणि तत्पर कृती जीवन वाचवू शकते. म्हणूनच मॉक ड्रिलद्वारे नागरिकांना व संस्थांना प्रत्यक्ष सराव करून सज्ज करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात उंच इमारती, व्यावसायिक प्रकल्प आणि गर्दीच्या ठिकाणी सुरक्षेची जाणीव असणे अत्यंत गरजेचे आहे. आमच्या विभागाकडून अशा प्रकारच्या सरावाचे आयोजन सातत्याने करण्यात येईल. यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची जाणीव वाढेल आणि आपत्तीला सामोरे जाताना घाबरून न जाता योग्य कृती करण्याची सवय लागेल.

- उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त (अग्नि), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

हॉटेलमध्ये हजारो नागरिक व कर्मचारी दररोज ये-जा करतात. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाची योग्य तयारी व आपत्कालीन परिस्थितीत तातडीची सुटका करणे अतिशय महत्त्वाचे आहे. या मॉक ड्रिलमुळे हॉटेल कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास दृढ झाला आहे. आमचे उद्दिष्ट फक्त प्रात्यक्षिक दाखवणे नाही, तर प्रत्यक्ष परिस्थितीत कर्मचारी घाबरून न जाता त्वरित निर्णय घेऊ शकतील याची खात्री करणे आहे. हॉटेल व्यवस्थापनाने देखील सतत प्रशिक्षण व उपकरणांची तपासणी करणे आवश्यक आहे. अशा सरावांमुळे प्रशासन, हॉटेल व्यवस्थापन व नागरिक यांच्यात समन्वय अधिक मजबूत होतो.

- विजय घुगे, प्रभारी उपअग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग

# प्रेमात वेडे असाल तर 'आरपार'ला नक्की जाल..

## 'आरपार' हा सिनेमा प्रेक्षकांच्या मनातून होतोय आरपार

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सध्या सर्वत्र एका मराठी चित्रपटाच्या टिझर, पोस्टर आणि गाण्यांनी हवा केलेली पाहायला मिळतेय. या चित्रपटातून एक नवी कोरी जोडी रोमँटिक अंदाजात प्रेक्षकांच्या भेटीस आल्याचं चित्रपटातून समोर आलं आणि चित्रपटाबाबतची उत्सुकता ताणली गेली. अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री ऋता दुर्गुळे यांचा 'आरपार' हा सिनेमा येत्या १२ सप्टेंबर पासून सिनेमागृहात प्रदर्शित झाला. प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाबाबतची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये लागून राहिली होती. शिवाय ललित आणि ऋताचा खूप मोठा चाहतावर्ग आहे आणि या चाहत्या वर्गाला या दोन्ही कलाकारांना मोठ्या पडद्यावर एकत्र पाहणं खूप रंजक ठरलं. आणि बॉक्स




ऑफिसवर बक्कळ कमाई करत हा सिनेमा चर्चेत आला आहे. इतकंच नाहीतर चित्रपटगृहांमध्ये हा सिनेमा तुफान गाजत आहे.'प्रेमात अधलं मधलं काही नसतं' हे सांगणारा हा रोमँटिक चित्रपट आता मोठ्या पडद्यावर धुमाकूळ घालत आहे. ललित आणि ऋतासह चित्रपटात कलाकारांची तगडी स्टारकास्ट पाहायला मिळत आहे. अभिनेते माधव अभ्यंकर, सुहिता हट्टे, स्नेहलता वसईकर, वीणा नायर, जान्हवी सावंत ही कलाकार मंडळीही चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. याचबरोबर चित्रपटाची खास बाब म्हणजे चित्रपटातील गाणी. रोमँटिक गाण्यांसह चित्रपटातील जागरण गोंधळने तर साऱ्यांच लक्ष वेधलं. चित्रपटातील काही गाणी थिरकायला भाग पाडण्यास लावत आहेत यांत शंकाच नाही. चित्रपटात ललित- ऋता यांच्यातील प्रेम आणि दुरावा याचे समीकरण पाहायला मिळत आहे.'लिऑन्स मीडिया प्रॉडक्शन एलएलपी' प्रस्तुत, निर्माते नामदेव काटकर, रितेश चौधरी निर्मित 'आरपार' हा सिनेमा आहे. तर अभिनेता ललित प्रभाकरने या चित्रपटाची सहनिर्माता ही भूमिका सांभाळली आहे. अभिनयाबरोबर आता ललितने निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकलं आहे.

या सिनेमाचे दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद या धुरा गौरव पत्की यांनी सांभाळल्या आहेत. प्रेमाची अनोखी परिभाषा मांडणारा हा रोमँटिक सिनेमा ऋता व ललित या नव्या जोडीसह सगळ्याच बॉक्स ऑफिसवर गाजतोय.

# शाळकरी मुलाला धमकावून अत्याचार!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शाळेतून घरी निघालेल्या एका १३ वर्षीय मुलाला अडवून त्याच्या ओळखीतील एका अल्पवयीनाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एका १७ वर्षीय अल्पवयीन युवकाविरुद्ध बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.याबाबत मुलाच्या आईने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अल्पवयीनाविरुद्ध




बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित १३ वर्षीय मुलगा ११ सप्टेंबर रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास शाळेतून घरी निघाला होता. त्यावेळी आरोपी अल्पवयीनाने त्याला अडविले. खेळायला जाऊ अशी बतावणी केली. त्यानंतर मुलाला शाळेच्या परिसरात एका झाडाजवळ नेऊन त्याला पैसे देण्याचे आमिष दाखविले. मुलावर त्याने अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मुलाने त्याला विरोध केल्यानंतर त्याला मारण्याची धमकी देऊन त्याच्यावर अत्याचार करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक सानप तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 18/09/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान 'अमृत महोत्सव' शिबिर

## 275 हून अधिक रक्तदात्यांनी केले रक्तदान

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड: देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीने 'सेवा पंधरवडा' अभियानांतर्गत भव्य रक्तदान 'अमृत महोत्सव' शिबिराचे आयोजन केले होते. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित केलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या शिबिराचे उद्घाटन शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंतराव हरहरे यांच्या हस्ते झाले. या वेळी २७५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या शिबिराला



अनेक मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यामध्ये आमदार शंकर जगताप,आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, माजी महापौर उषाताई ढोरे, जिल्हा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, आणि वैशालीताई खाडये यांचा समावेश होता.याव्यतिरिक्त, भाजपा राज्य परिषद सदस्य पाटील चिंचवडे आणि धर्मेंद्र क्षीरसागर, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, माजी उपमहापौर तुषार हिंगे, माजी नगरसेविका उषाताई मुंढे, निर्मलाताई कुटे,आरतीताई चोंधे,अश्विनीताई चिंचवडे,माजी नगरसेवक विनायक गायकवाड,संदीप कस्पटे,विठ्ठल भोईर, बिभीषण चौधरी,मंडल अध्यक्ष अनिताताई वाळुंजकर,शिवराज लांडगे,धरम वाघमारे,मोहन राऊत,शहर पदाधिकारी उपाध्यक्ष राम वाकडकर,अमित पसरणीकर,रवी देशपांडे, कैलास सानप,खंडूदेव कठारे,हेमचंद्र मासुळकर,राजेंद्र बाबर,बापू घोलप, युवराज लांडे, दीपक भोंडवे,अभिजित बोरसे, संजय परळीकर, कविताताई हिंगे, दिपालीताई कलापुरे, आणि प्रीतीताई कामतीकर यांचीही उपस्थिती होती.

या शिबिराच्या आयोजनात भारतीय जैन संघटनेचे प्रकाश गादिया आणि विरेश छाजेड तसेच तेरापंथी युवक परिषदेचे पंकज गादिया यांनीही सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे संयोजक जयदिप खापरे यांनी प्रास्ताविक केले, तर सहसंयोजक नामदेव पवार यांनी सूत्रसंचालन केले आणि विनोद मालू यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा रक्तदान 'अमृत महोत्सव' यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले.

# शेतमाल निर्यात वाढीसाठी निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा - मंत्री जयकुमार रावल

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतमाल निर्यात वृध्दी करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे, शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. भाजीपाला व फळे निर्यात करण्यासाठी जगात ज्या बाजारपेठेत मागणी त्याचा अभ्यास करून तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. भौगोलिक मानांकनानुसार राज्यातील फळांचे ब्रँडिंग करावे.निर्यात मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात यावे.

राज्यातील निर्यात सुविधा केंद्र सक्षम करून ही सुविधा केंद्रे पूर्ण क्षमतेने २४x७ सुरु ठेवावेत, असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन



मंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रविणकुमार नहाटा, दोडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, मलकापूरचे संजय काजळे-पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मुख्य व्यवस्थापक विनायक कोकरे, नाबार्डचे उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते. रावल म्हणाले, शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर देण्यासाठी जागतिक बाजार व्यवस्थेचा अभ्यास करावा.राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाला उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत जेथे मागणी असेल तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे.

तसेच पणन सुविधा सक्षम करून प्रभावीपणे काम करणाऱ्या राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या पाठीशी सरकार सक्षमपणे उभे आहे. अशा बाजारसमित्यांना अधिक काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.बाजार समितीच्या क्षेत्रीय पीकपद्धती, त्यादृष्टीने उपलब्ध पायाभूत सुविधा, आधुनिकीकरणाची गरज, भविष्यात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांचा अभ्यास करुन आगामी १० वर्षाचा व्यवसाय विकास आराखडा तयार करावा. बाजार समितीने ५, १० आणि १५ एकर जागेत बाजारपेठ निर्मितीकरिता विविध पायाभूत सुविधांचा समावेश करुन आदर्श पायाभूत आराखडा तयार करा.राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे, यादृष्टीने काम करणाऱ्या बाजार समितीला पणन मंडळाच्यावतीने प्रोत्साहन देण्यात येईल, असे निर्देश मंत्री श्री. रावल यांनी दिले. मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत राज्यात फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र निर्माण करण्यात आले असून शेतकऱ्यांना त्याचा मोठया प्रमाणात लाभ झाला पाहिजे.

काजू सोलरबेस ड्राय काजू प्रक्रिया केंद्र प्रकल्प तयार करा. शेतमालाचे अधिकाधिक निर्यातीकरणाच्यादृष्टीने नवीन योजना तयार करावा.जागतिक दर्जाच्या पणन सुविधांचा विचार करुन ठाणे जिल्ह्यातील बापगाव आणि नागपूर जिल्ह्यातील काळडोंगरी येथील जागा विकसित करण्याकरिता प्रकल्प अहवाल तयार करावा, एकूणच बाजार समित्यांना बळकट करण्याकरिता नियोजन करावे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579